

अतिरिक्त आयुक्तांची शाळेला अचानक भेट

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 01/08/2025 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 169 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी प्रज्ञा सिंह ठाकूर सह सर्व आरोपी निर्दोष!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत







मुंबई : मालेगावमधील २००८ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांशी संबंधित खटल्याचा निकाल न्यायालयाने गुरूवारी दिला आहे. या प्रकरणात भाजपाच्या माजी खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर आणि कर्नल पुरोहित यांच्यासह सातही आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आलं आहे. या निकालावर राजकीय स्तरातून प्रतिक्रिया येत आहेत. देशातील दहशतवादाशी संबंधित दीर्घकाळ चाललेल्या खटल्यांपैकी एक असलेल्या मालेगाव बॉम्बस्फोटाशी संबंधित खटल्याचा निकाल राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) कायद्याअंतर्गत स्थापन विशेष न्यायालयाने आज दिला असून साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, ले. कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सात आरोपींची पुराव्याअभावी सुटका करण्यात आली आहे. मालेगावमध्ये स्फोट झाल्याचे सरकारी वकिलांनी सिद्ध केले, परंतु तपासात अनेक त्रुटी होत्या. काही वैद्यकीय प्रमाणपत्रांमध्ये छेडछाड केली होती. मोटारसायकलमध्ये बॉम्ब ठेवण्यात आला होता हे वकील सिद्ध करू शकले नाहीत. तसेच, जखमींचे वयही चुकीचे होते. त्यामुळे सबळ पुराव्यांअभावी सर्वांना निर्दोष मुक्त करण्याचा निर्णय देण्यात आला.नाशिक जिल्ह्यातील मालेगाव या शहरात मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात राहतो. या ठिकाणीच हा स्फोट झाला होता. २९ सप्टेंबर २००८ रोजी लोक रमजान महिना आणि नवरात्रोत्सव साजरा करण्यात व्यस्त होते. रात्री ९.३५ वाजता मालेगावमधील भिखू चौकात बॉम्बस्फोट झाला. सर्वत्र धूर आणि लोकांचे किंकाळ्या ऐकू येत होत्या. ६ जणांचा जागीच मृत्यू झाला. १०० हून अधिक लोक जखमी झाले.१७ वर्षांच्या खटल्यानंतर न्यायालयाने १९ एप्रिल रोजी सर्व सात आरोपींविरुद्ध निकाल राखून ठेवला. निकाल जाहीर करण्याची तारीख ८ मे निश्चित करण्यात आली होती. सर्व आरोपींना या दिवशी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते, परंतु त्यानंतर न्यायालयाने निकाल जाहीर करण्यासाठी ३१ जुलै ही तारीख निश्चित केली. त्यानुसार हा निकाल देण्यात आला.

# लाडकी बहीण योजना : शासकीय महिला कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे:'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेणाऱ्या शासकीय महिला कर्मचाऱ्यांकडून रक्कम वसूल करण्यात येणार आहे. त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई केली जाणार असल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्ताने आंबेगाव तालुक्यातील मंचर येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी तटकरे यांनी हा इशारा दिला. यावेळी माजी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, म्हाडाच्या पुणे विभागाचे अध्यक्ष, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासह स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. लाडकी बहीण योजनेचा लाभ काही शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी घेतल्याचे पुढे आले आहे. त्या तक्रारींची तपासणी सुरू झाली आहे. त्यामध्ये दोषी आढळलेल्या महिला कर्मचाऱ्यांकडून ही रक्कम वसूल केली जाईल आणि ती कोषागारात जमा केली जाईल. तसेच त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई ही करण्यात येईल,'असे तटकरे यांनी सांगितले. 'महिलांच्या सक्षमीकरणामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील यांचे मोठे योगदान आहे.' असे तटकरे म्हणाल्या. वळसे-पाटील म्हणाले,'महिलांना उद्योग व्यवसाय उभारणीसाठी जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून दहा लाख रुपयांपर्यंतचा कर्जपुरवठा केला जात आहे. उद्योग व्यवसाय उभारणीसाठी महिलांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.'

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 01/08/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# भाजप शहर जिल्हा समितीमध्ये 'कर्तृत्वावरच मिळणार पद'!

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : भारतीय जनता पक्ष,पिंपरी- चिंचवड शहर जिल्हा समितीच्या अंतर्गत नव्याने नियुक्त होणाऱ्या विविध विभागीय समित्यांमध्ये पदासाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांच्या मुलाखती नुकत्याच मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या. यावेळी एकूण १८० इच्छुक कार्यकर्त्यांची मुलाखत घेण्यात आली. अजूनही ही प्रक्रिया प्रगतिपथावर असून लवकरच ही प्रक्रिया पूर्ण होईल.जिल्हा कार्यकारिणीसाठी १ अध्यक्ष, ८ उपाध्यक्ष, ४ सरचिटणीस(१ SC/ST, १ महिला ), ८ चिटणीस, १ कोषाध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी (७ महिला,२ SC/ST) तसेच ६९ जिल्हा कार्यकारिणी सदस्य (२३ महिला व ४ SC/ST) अशी रचना असते तसेच विविध मोर्चा,प्रकोष्ठ सेल अध्यक्ष यांची नियुक्ती देखील या प्रक्रियेच्या माध्यमातून केली जाते.ही संपूर्ण प्रक्रिया भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यांच्यासोबत विविध विभाग प्रमुख, शहर कार्यकारिणी सदस्य, व वरिष्ठ पदाधिकारी देखील उपस्थित होते.मुलाखतीदरम्यान प्रत्येक इच्छुकाने संघटनात्मक अनुभव,सामाजिक योगदान आणि भविष्यातील कार्ययोजना यावर आपली मते मांडली. यावेळी एकूण १८० पेक्षा अधिक इच्छुक कार्यकर्त्यांनी आपली नावे नोंदवून मुलाखतीसाठी उपस्थिती लावली.मुलाखतीदरम्यान इच्छुक कार्यकर्त्यांकडून त्यांच्या संघटनात्मक अनुभव, सामाजिक कार्यातील सहभाग, पक्षविषयक ज्ञान,भविष्यकालीन कार्ययोजना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्न काटे यांनी यावेळी स्पष्टपणे सांगितले की, "भारतीय जनता पक्षात पद ही जबाबदारी आहे. ही जबाबदारी कर्तृत्ववान, निष्ठावान, संघटनेच्या तळागाळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना दिली जाईल. पक्षाची परंपरा गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देणारी आहे. त्यामुळे कोणत्याही शिफारसीपेक्षा इच्छुकांच्या कर्तृत्व, जबाबदारीची जाणीव आणि संघटनेप्रती निष्ठा या आधारेच त्यांची नियुक्ती केली जाणार आहे,असे शहराध्यक्षांनी स्पष्ट केले.

लवकरच निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांची अधिकृत यादी जाहीर करण्यात येणार आहे .या निवड प्रक्रियेमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य, पारदर्शकता आणि स्पर्धात्मकता निर्माण झाली आहे. ही प्रक्रिया केवळ औपचारिक नव्हे, तर कार्यक्षम नेतृत्व तयार करण्यासाठीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

मुलाखतीदरम्यान अनेक नव्या चेहऱ्यांनी सकारात्मक व व्यावहारिक दृष्टिकोन मांडला, ज्यामुळे शहरात भाजपचा पुढील नेतृत्वाचा मजबूत पाया घातला जात आहे.

# पीसीयूच्या विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय इंटर्नशिप साठी निवड

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील आघाडीच्या तंत्रज्ञान विद्यापीठ तसेच कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करण्याची आणि औद्योगिक वातावरणाचा अनुभव घेण्याची संधी पिंपरी चिंचवड विद्यापीठातील (पीसीयू) विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. त्या अंतर्गत मलेशिया मधील युनिव्हर्सिटी टेक्नोलॉजी पेट्रोनास (यूटीपी) येथे टर्म इंटर्नशिप प्रोग्रॅमसाठी पीसीयूच्या विद्यार्थ्यांची निवड झाली हे गौरवास्पद आहे असे पीसीयू चे कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या संगणक अभियांत्रिकीच्या बीटेक मधील चार विद्यार्थ्यांची यूटीपी मध्ये निवड झाली. यामध्ये तन्वी काकडे आणि आर्य भोईटे (अंतिम वर्ष), श्रेया कोळी आणि माहि बेदरे (द्वितीय वर्ष) यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी कुलगुरू डॉ. कुलकर्णी बोलत होते. यावेळी प्र - कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, डॉ. रोशनी राऊत आदी उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले की, यूटीपी विद्यापीठ हे दक्षिण आशियात औद्योगिक क्षेत्रातील संबंधांसाठी प्रसिद्ध आहे. यामुळे विद्यार्थ्यांना नामांकित तज्ज्ञांसोबत काम करण्याची, नाविन्यपूर्ण प्रकल्पांमध्ये सहभाग घेण्याची आणि प्रगत तांत्रिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी व जागतिक औद्योगिक अनुभव मिळेल. ही निवड पीसीयूच्या उत्कृष्ट शैक्षणिक दर्जाची आणि जागतिक स्तरावर उभ्या राहत असलेल्या विश्वासार्हतेची साक्ष देणारी आहे.

प्र - कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे म्हणाले की, ही उल्लेखनीय कामगिरी पीसीइटी आणि पीसीयू इंटरनॅशनल रिलेशन्स ऑफिस आणि स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या सहकार्याने डॉ. करूणा भोसले, डॉ. रोशनी राऊत, प्रा. शितल येवले यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड झाली. या इंटरनशिप मुळे त्यांना मिळणारे जागतिक अनुभव त्यांचा दृष्टिकोन विशाल होऊन उद्योजकीय नेतृत्व विकसित होईल.

पीसीयूमध्ये परिवर्तन घडवणारे अनुभव देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

या यशस्वी निवडीद्वारे पीसीयू च्या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्याचे ध्येय गाठणे आणि उद्योजक बनवण्याच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. या यशस्वी विद्यार्थ्यांचे कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, पीसीयू व्यवस्थापन प्रतिनिधी अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# अतिरिक्त आयुक्तांची शाळेला अचानक भेट

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होळी बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.



पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट मिळाले आहे का, याची तपासणी आता शिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट आज चऱ्होळी बु. येथील शाळेला अचानक भेट देत तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचा दर्जा कसा आहे, हे देखील जाणून घेतले.

जांभळे पाटील यांनी शाळेमध्ये प्रवेश केल्यानंतर सर्वात प्रथम ते इयत्ता चौथीच्या वर्गात गेले. तेथे गेल्यानंतर त्यांनी हा कितवीचा वर्ग आहे? तुम्हाला गणवेश मिळाला का? वर्गात किती विद्यार्थी आहेत? आज कोण गैरहजर आहे? तुम्हाला शैक्षणिक साहित्य मिळाले का? रंगपेटी मिळाली का? यंदाच्या वर्षी शैक्षणिक साहित्यात देण्यात आलेली पाण्याची बाटली आवडली का? तुम्हाला मिळालेले सर्व साहित्य व्यवस्थित आहे का? शिष्यवृत्ती परीक्षेला कोणकोण बसणार आहे? शाळा किती वाजता भरते? तुम्हाला कोणता विषय आवडतो? असे प्रश्न विचारत विद्यार्थ्यांसोबत मनमोकळा संवाद साधला. विद्यार्थ्यांनी देखील जांभळे पाटील यांना प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिले. यावेळी जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना महापालिकेकडून शिष्यवृत्ती उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येत असलेल्या भारत दर्शन उपक्रमाची देखील माहिती दिली.

चऱ्होळी बु. शाळेतील जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे कीट मिळाले असल्याचे निर्देशनास आले. तर उर्वरीत विद्यार्थ्यांना अद्याप कीट का मिळाले नाही, याबाबत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. त्यानंतर तातडीने शैक्षणिक साहित्याचे कीट मागवून घेत विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी सदर शैक्षणिक कीट स्वतःच्या हाताने फोडून त्यामध्ये असणाऱ्या साहित्याची तपासणी जांभळे पाटील यांनी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना गणवेश व शूज मिळाले नसल्याचे लक्षात आल्यानंतर जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसाच्या आत गणवेश व शूज देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर होईल, याची काळजी घेण्याच्या सूचनाही शाळेल्या शिक्षकांना दिल्या.

तसेच शाळेतील स्वच्छतागृहाची देखील अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी तपासणी केली. त्यानंतर स्वच्छतागृहाची नियमित स्वच्छता करण्याबाबत त्यांनी आरोग्य विभाग, क्षेत्रिय अधिकारी यांना फोन लावून निर्देश दिले. तसेच शाळेल्या वर्गामध्ये असणारी वायरिंग व्यवस्थित करण्याबाबत विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांना फोन करून निर्देश दिले. शाळेतील सीसीटीव्ही सुरू आहेत का, याचीही तपासणी त्यांनी केली. विद्यार्थ्यांसाठी वर्गखोल्या वाढवण्यात याव्यात, शाळेचे मुख्य प्रवेशद्वार मोठे करावे, अशी मागणी शाळेतील शिक्षकांनी केली. त्यानंतर शाळेतील वर्गखोल्यांची संख्या वाढवण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव पाठवणे व शाळेचे मुख्य प्रवेशद्वार मोठे करण्याबाबत संबंधित विभागाला जांभळे पाटील यांना निर्देश दिले.

**शालेय पोषण आहाराची घेतली माहिती**

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत देखील अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. तसेच पोषण आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण तपासण्यासाठी तो स्वतः खाऊन पाहिला. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता ही उत्तमच असावी. त्याची वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तपासणी करावी. त्यामध्ये कुठलाही हलगर्जीपणा करू नका, असे निर्देशही त्यांनी दिले.

> विद्यार्थ्यांना 'डीबीटी'च्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा दर्जा तपासणे व विद्यार्थ्यांच्या या साहित्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आज चऱ्होळी बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली होती. तसेच महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा त्यांना फायदा कितीपत होत आहे? भारत दर्शन सारख्या उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती आहे का? हे जाणून घेण्याचा उद्देशही या भेटीमागे होता. आगामी काळामध्येही अशा प्रकारे अचानक शाळांना भेट देऊन तपासणी सुरू राहतील.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# दिपक मधुकर भोंडवे सोशल फाउंडेशन वतीने 'चला खेळू मंगळागौर' कार्यक्रम

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : दिपक मधुकर भोंडवे सोशल फाउंडेशन आणि चंद्रभागा कॉर्नर महिला बचत गट यांच्या माध्यमातून 'चला खेळू मंगळागौर'कार्यक्रम चंद्रभागा कॉर्नर,रावेत येथे अत्यंत उत्साहात पार पडला. श्रावण महिन्यात साजरा करण्यात येणाऱ्या या मंगळागौर सोहळेला मोठ्या संख्येत पारंपरिक वेशभूषेत महिलांनी उपस्थिती लावली होती.




कार्यक्रमादरम्यान अनेक पारंपरिक खेळ सादर करण्यात आले जसे की फुगडी, झिम्मा, लाटाबाई लाटा इ. विविध कार्यक्रमात-खेळांमध्ये सहभागी झालेल्या महिलांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.माझ्या लाडक्या माता-भगिनींना होणाऱ्या नवरात्र-दांडिया उत्सव सोबत मंगळागौर चा आनंदही घेता यावा या उद्देशाने हे आयोजन करण्यात आले होते.

सुप्रिया दिपक भोंडवे आणि मोनाली संतोष भोंडवे यांच्या मार्गदर्शनात आणि चंद्रभागा कॉर्नर येथील सर्व महिला बचत गट यांचे मोलाचे सहकार्य लाभले. मोनाली संतोष भोंडवे यांनी उपस्थित सर्व स्पर्धक प्रेक्षक महिलावर्ग आणि मान्यवरांचे आभार मानले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 01/08/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# भक्तिमय वातावरणात अवतरले 'स्वामी'!




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे: 'अनंतकोटी ब्रह्मांडनायक', 'जय जय स्वामी समर्थ' असा जयघोष अन भक्तिमय वातावरणात 'स्वामी' प्रेक्षागृहात अवतरले. स्वामींचा अगाध महिमा ध्वनिचित्रफितीतून मांडणाऱ्या 'स्वामी-२' या भक्तिगीताचे लोकार्पण मंगळवारी झाले. किवळे येथील एमडीएस बँक्वेट्समध्ये आयोजित सोहळ्यात स्क्रीनवर स्वामींची लीला अन प्रेक्षागृहात प्रत्यक्ष स्वामींच्या रूपातील दर्शनाची उपस्थितांनी अनुभूती घेतली.**

भैरवा फिल्म्स निर्मित 'स्वामी' या भक्तिगीताला मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर 'स्वामी-२' या पुढील भागाची निर्मिती करण्यात आली आहे. सत्य घटनेवर व अनुभवावर आधारित या गीतामध्ये युवा उद्योजक डॉ. प्रशांत गवळी यांनी भावस्पर्शी अभिनय केला आहे. मनीष महाजन यांचे दिग्दर्शन, हर्षवर्धन वावरे यांचे गायन, नरहर राहेरकर व ब्रह्मा महाजन यांचे गीत व संगीत संयोजन यामुळे हे गाणेही 'स्वामी'सारखेच अतिशय दर्जेदार झाले आहे. डॉ. प्रशांत गवळी यांचा संघर्षमय जीवनपट या गाण्यातून उलगडला आहे.

'स्वामी-२'च्या लोकार्पणावेळी उद्योजक अविनाश तुपे, उस्मान शेख, प्रकाश मंगाने, सुदामा दास, योगिता गवळी, ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले, 'स्वामी' गाण्याचे गायक अवधूत गांधी, अक्षय वाघमारे, सागर दोलताडे, अभिजित बोराटे, अभिनेता प्रतीक लाड, अरबाझ शेख, हंसराज जगताप आदी उपस्थित होते.

डॉ. प्रशांत गवळी म्हणाले, "माझ्या आईमध्ये मला स्वामी दिसतात. स्वामींची माझ्यावर मोठी कृपा आहे. स्वामींच्या छायेत, अध्यात्मिक भावनेतून आजवर काम करतो आहे. माझ्या आयुष्यात स्वामींची झालेली कृपा या गीताच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जगताना येणाऱ्या अडचणी, वेदना दूर करण्याचे काम स्वामी करतात, हे पावलोपावली अनुभवतो आहे. प्रत्येकाला प्रेरणा देणारे हे गीत आहे. पहिल्या भागाला दीड कोटींपेक्षा अधिक स्वामीभक्तांनी पाहिले आहे. या गीतालाही स्वामीभक्तांचा उदंड प्रतिसाद मिळेल, असा विश्वास आहे."

ब्रह्मा महाजन म्हणाले, "स्वामींच्या कृपेने सर्वांचे आयुष्य आनंदी होऊ शकते. भक्तिभावाने, श्रद्धेने स्वामींची सेवा केली, तर सामान्य माणूसही कसा यशस्वी होतो, हे दाखवणारे हे गाणे आहे. पहिल्या भागाला मिळालेला प्रतिसाद आमच्यासाठी ऊर्जादायी होता. प्रशांत गवळी यांचे संघर्षमय जगणे आणि स्वामींच्या आशीर्वादाने त्यांनी केलेली वाटचाल या दोन्ही भागांमधून मांडण्याचा हा प्रयत्न लोकांना नक्की आवडेल."

# विकासाच्या वाटचालीत ज्येष्ठांचे मार्गदर्शन महत्वाचे - नाना काटे



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : विकासकामे करत असताना ज्येष्ठ नागरिक आम्हाला वारंवार विविध सुचना करत असतात, त्यांच्या सुचना आम्हाला विकासकामासाठी नेहमीच मार्गदर्शक ठरतात, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड मनपाचे मा. विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी केले. पिंपरी चिंचवड परिसरातील पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न झाली.**

त्यावेळी ज्येष्ठांनी त्यांनी संवाद साधला. नाना काटे यांच्या हस्ते यावेळी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना शाल, श्रीफळ आणि गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. गुरुवार दि. ३१ जुलै रोजी गोविंद गार्डन हॉटेलच्या बांसुरी हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमात नाना काटे यांच्यासह पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे, डॉ. कुंदाताई भिसे, माजी नगरसेविका निर्मला कुटे, पी. के. इंटरनॅशनल स्कूलचे संचालक जगन्नाथ काटे, ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ आणि सरचिटणीस ईश्वरलाल चौधरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिपप्रज्वलन आणि सरस्वतीचे प्रतिमा पूजन करण्यात आले. शोभा राजगुरे, निर्मला कासार आणि आणि शकुंतला शिंदे यांनी स्वागतगीत सादर केले. असोसिएशनचे सचिव सखाराम ढाकणे यांनी अहवाल वाचन केले. खजिनदार सुभाष पाटील यांनी आर्थिक लेखा जोखा सादर केला. डॉ. सुभाष पवार यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आयोजित करण्यात गीत - संगीत मैफलीत भारती न्यायाधीश आणि संतोष माहेश्वरी या कलावंतांनी बहारदार हिंदी - मराठी गाण्यांव्दारे उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली. विसरू नको श्रीरामा मला, परदेसीयाँ ये संच पिया, जय जय शिवशंकर या काही गाण्यांना ज्येष्ठ नागरिकांनी विशेष प्रतिसाद दिला.

त्याआधी पद्मा गवळी आणि सहकाऱ्यांनी भजन सादर केले. त्यांना मृदंगावर प्रकाश दळवी आणि संवादिनीवर बाळकृष्ण चौधरी यांनी साथसंगत केली. संपूर्ण कार्यक्रमाच्या सुत्रसंचलनाची जबाबदारी शकुंतला शिंदे यांनी सांभाळली. आभार विवेकानंद लिगाडे यांनी मानले. सभेच्या यशस्वीतेसाठी रमेश वाणी, अनिल कुलकर्णी, रमेश चांडगे, अशोक येळंमकर, अनिलकुमार शाह यांनी परिश्रम घेतले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968